सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

**संदर्भ क्र. विविमं/२०२५-२६/४८८** **दि. ०९/०१/२०२६**

**प्रति,**

**मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,**
**विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग.**

**विषय : मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी मतदार जागृती अभियानपर विविध स्पर्धांच्या आयोजनाबाबत.**

**संदर्भ क्र. : १. मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचे जा.क्र. रानिआ/मावज-२०२५/प्र.क्र.४/का-१० दि. १२/०६/२०२५ चे पत्र.**
**२. विद्यार्थी विकास मंडळाचे विविमं/२०२५-२६/४७६ दि. ०७ जानेवारी, २०२६ रोजीचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये, महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायत, जिल्हा परिषदा/पंचायत समित्या या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांत मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी अधिकाधिक मतदारांनी मतदान करणे आवश्यक आहे. त्यासाठी मतदार जागृती अभियान राबविण्याकरिता पूर्वनियोजन करणे गरजेचे असून त्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाने मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्यानुसार नियोजन करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये प्रभावीपणे मतदार जागृती अभियान राबविण्यात यावे असे निर्देशित करण्यात आले होते. मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांनी मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी विद्यापीठ व महाविद्यालयांना खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना दिल्या होत्या.

- विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये मतदार जागृतीबाबत वादविवाद, वकृत्व, निबंध, चित्रकला, पथनाट्य, रिल्स इ. स्पर्धांचे आयोजन करणे.
- विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरव करून, त्यांनी सादर केलेल्या कलांचा मतदार जागृतीसाठी वापर करणे.
- महाविद्यालयांच्या मदतीने अधिकाधिक मतदारांना प्रोत्साहन देण्यासाठी सोसायट्यांना दत्तक देऊन घराघरापर्यंत पोहोचणे.
- उत्कृष्ट काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना किंवा सोसायट्यांना बक्षिसे देण्याबाबत विचार करणे.

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था, विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांकरिता विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना या विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी मतदार जागृती अभियानपर स्लोगन, घोषवाक्य, चारोळी, आकर्षक सेल्फी व आकर्षक रील्स अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

आपल्या महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्था, विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांना सोबत जोडलेल्या पत्रकातील गुगल फॉर्म साठी दिलेल्या क्यू आर कोडवर/https://forms.gle/L8PfFGPRdb4CVrc57 या गुगल फॉर्मच्या लिंक वर मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी मतदार जागृती अभियानपर स्लोगन, घोषवाक्य, चारोळी, आकर्षक सेल्फी व आकर्षक रील्स अपलोड करण्याबाबत सूचित करावे.

आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील मुख्य सूचनाफलकांवर तसेच जिथे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी एकत्र येत असतात (उदा. ग्रंथालय/वाचनकक्ष/वर्गखोल्या/विश्रांतीगृह/उपहारगृह/वसतिगृह) अशा दर्शनी भागात ही सुचना प्रदर्शित करून सर्व विद्यार्थ्यांना व इतर सर्व सदस्यांच्या निदर्शनास आणून मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी वरील स्पर्धांमध्ये सहभागी होण्यास सूचित करावे.

सदर उपक्रम विद्यार्थी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/परिसंस्थातील उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामुहिक सहभागातून यशस्वी करण्याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना सूचित करण्यात यावे.

सद्यस्थितीत महानगरपालिका, नगरपरिषद, व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका २०२५ ची आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. याबाबत निवडणूक आयोगाने दि. ४.११.२०२५ रोजी आदेश निर्गमित केले आहे. राज्य निवडणूक आयोगाचे सदर आदेश विचारात घेऊन अल्पसंख्याक हक्क दिवशी सदर कार्यक्रमांचे आयोजन करतांना आचारसंहितेचा भंग होणार नाही याची तसेच या कार्यक्रमास राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी/प्रतिनिधी उपस्थित राहणार नाहीत, याची दक्षता घेण्यात यावी. सदर आयोजन करताना आदर्श आचारसंहितेचा कोणताही भंग होणार नाही तसेच याबाबत शासनाच्या प्राप्त निर्देशांचे तंतोतंत पालन होईल याची नोंद घ्यावी. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे

**(डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ

आयोजित

# मतदान जागृती स्लोगन/घोषवाक्य व चारोळी स्पर्धा

## (स्लोगन/घोषवाक्य व चारोळी स्पर्धा)

**मतदान जनजागृतीसाठी तुमचा विचार मांडाच,**
**लोकांचा कौल मिळवाच आणि बक्षिसे जिंकाच...**

जास्तीत जास्त Likes मिळवणाऱ्या सहभागींना आकर्षक बक्षिसे व प्रमाणपत्र

लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान जनजागृतीवर आधारित आकर्षक

## स्लोगन/घोषवाक्य व चारोळी स्पर्धा

मतदान विषयावरील प्रभावी स्लोगन/घोषवाक्य व चारोळी
तयार करून सोशल मिडीयावर आपल्या फाटोसह पोस्ट करा.

### स्पर्धेचे नियम

* सहभागी एका पेक्षा अधिक स्लोगन/घोषवाक्य व चारोळी अपलोड करू शकता.
* कोणत्याही राजकीय पक्ष/चिन्ह/प्रचार निषिद्ध आहे.
* मजकूर सभ्य, समाजोपयोगी व लोकशाही मूल्यांवर आधारित असावा
* पोस्ट Public असणे आवश्यक आहे.
* Likes ची संख्या अंतिम ग्राह्य धरली जाईल.
* जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागाबाबत महाविद्यालयास क्रमांक दिला जाईल.
* सोबतच्या क्यूआर कोडवर स्पर्धेची माहिती भरण्यात यावी.

### स्पर्धेचे विषय

* मतदानाचे महत्त्व
* संविधानिक अधिकार
* लोकशाहीची जबाबदारी
* सजग मतदार – सक्षम भारत

### दिनांक

दिनांक १५ जानेवारी, २०२६
पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.








# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ

आयोजित

# मतदान जागृती Selfie स्पर्धा

## मतदान जनजागृतीसाठी तुमचा विचार मांडाच, लोकांचा कौल मिळवाच आणि बक्षिसे जिंकाच...

जास्तीत जास्त Likes मिळवणाऱ्या सहभागींना आकर्षक बक्षिसे व प्रमाणपत्र

लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान जनजागृतीवर आधारित

## सेल्फी (Selfie) स्पर्धा

मतदान झाल्यानंतर आकर्षक सेल्फी काढून सोशल मिडीयावर आपल्या पोस्ट करावी.

### स्पर्धेचे नियम

* फक्त एकच सेल्फी पाठवण्यात यावा.
* कोणत्याही राजकीय पक्ष/चिन्ह/प्रचार निषिद्ध आहे.
* सेल्फी स्पष्ट, ठळक असावा.
* पोस्ट Public असणे आवश्यक आहे.
* Likes ची संख्या अंतिम ग्राह्य धरली जाईल.
* जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागाबाबत महाविद्यालयास क्रमांक दिला जाईल.
* सोबतच्या क्यूआर कोडवर स्पर्धेची माहिती भरण्यात यावी.

### स्पर्धेचा उद्देश

* मतदानाचे महत्त्व
* संविधानिक अधिकार
* लोकशाहीची जबाबदारी
* सजग मतदार - सक्षम भारत

### दिनांक

दि. १५ जानेवारी, २०२६ रोजी
मतदान केल्यानंतर
सायं. ७ वा. पर्यंत सोबतच्या
क्यूआर कोडद्वारे माहिती भरणे आवश्यक आहे.







# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ

आयोजित

# मतदान जागृती Reels स्पर्धा

**मतदान जनजागृतीसाठी तुमची समाज प्रबोधनपर रिल्स तयार करा,
लोकांचा कौल मिळवाच आणि बक्षिसेही जिंकाच...**

**जास्तीत जास्त Likes मिळवणाऱ्या सहभागींना आकर्षक बक्षिसे व प्रमाणपत्र**

लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान जनजागृतीवर आधारित

## आकर्षक रिल्स स्पर्धा

मतदान विषयावरील प्रभावी रिल्स तयार करून सोशल मिडीयावर आपल्या रिल्ससह पोस्ट करा.

### स्पर्धेचे नियम

* सहभागी एका पेक्षा अधिक रिल्स अपलोड करू शकतात.
* कोणत्याही राजकीय पक्ष/चिन्ह/प्रचार निषिद्ध आहे.
* मजकूर सभ्य, समाजोपयोगी व लोकशाही मूल्यांवर आधारित असावा
* पोस्ट Public असणे आवश्यक आहे.
* Likes ची संख्या अंतिम ग्राह्य धरली जाईल.
* जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागाबाबत महाविद्यालयास क्रमांक दिला जाईल.
* सोबतच्या क्यूआर कोडवर स्पर्धेची माहिती भरण्यात यावी.

### स्पर्धेचे विषय

* मतदानाचे महत्त्व
* संविधानिक अधिकार
* लोकशाहीची जबाबदारी
* सजग मतदार - सक्षम भारत

### दिनांक

दिनांक १५ जानेवारी, २०२६ पर्यंत
सोबतच्या क्यूआर कोडद्वारे
माहिती भरणे आवश्यक आहे.







सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

**संदर्भ क्र. विविमं/२०२५-२६/४७६** **दि. ०७/०१/२०२६**

**प्रति,**

**मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,**
**विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग.**

**विषय : मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी मतदार जागृती अभियान राबविण्याबाबत.**

**संदर्भ : मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचे जा.क्र. रानिआ/मावज-२०२५/प्र.क्र.४/का-१० दि. १२/०६/२०२५ चे पत्र.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायत, जिल्हा परिषदा/पंचायत समित्या या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांत मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी अधिकाधिक मतदारांनी मतदान करणे आवश्यक आहे. त्यासाठी मतदार जागृती अभियान राबविण्याकरिता पूर्वनियोजन करणे गरजेचे असून त्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाने मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्यानुसार नियोजन करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये प्रभावीपणे मतदार जागृती अभियान राबविण्यात यावे असे निर्देशित करण्यात आलेले आहे. मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांनी मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी विद्यापीठ व महाविद्यालयांना खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

- विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये मतदार जागृतीबाबत वादविवाद, वकृत्व, निबंध, चित्रकला, पथनाट्य, रिल्स इ. स्पर्धांचे आयोजन करणे.
- विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरव करून, त्यांनी सादर केलेल्या कलांचा मतदार जागृतीसाठी वापर करणे.
- महाविद्यालयांच्या मदतीने अधिकाधिक मतदारांना प्रोत्साहन देण्यासाठी सोसायट्यांना दत्तक देऊन घराघरापर्यंत पोहोचणे.
- उत्कृष्ट काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना किंवा सोसायट्यांना बक्षिसे देण्याबाबत विचार करणे.

स्थानिक गरजेनुसार आणि उपलब्ध संसाधनानुसार त्यांची अंमलबजावणी करणे, मतदार जनजागृती अभियान राबविण्यासाठी प्रचलित व विहित प्रशासकीय तथा वित्तीय नियमांचे काटेकोरपणे पालन करणे व महाविद्यालयाने आपल्यास्तरावर आणखी अभिनव उपक्रम राबविता येत असल्यास त्याचाही मतदार जागृती अभियानात समावेश करण्यात यावा. नमूद सूचना मार्गदर्शक स्वरुपाच्या असून, स्थानिक गरजेनुसार आणि उपलब्ध संसाधनांनुसार त्यांची अंमलबजावणी करावी. मतदार जागृती अभियान राबविण्यासाठी प्रचलित व विहित प्रशासकीय तथा वित्तीय नियमांचे काटेकोर पालन करावे; तसेच आपापल्या स्तरावर मार्गदर्शक सूचनांव्यतिरिक्त आणखी अभिनव उपक्रम राबविणे शक्य असल्यास तेही राबवावेत.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या निर्देशानुसार, महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायत, जिल्हा परिषदा/पंचायत समित्या या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांत मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी मतदार जागृती अभियान राबविण्यात यावे. याबाबतचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिका, नगरपरिषद, व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका २०२५ ची आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. याबाबत निवडणूक आयोगाने दि. ४.११.२०२५ रोजी आदेश निर्गमित केले आहे. राज्य निवडणूक आयोगाचे सदर आदेश विचारात घेऊन अल्पसंख्याक हक्क दिवशी सदर कार्यक्रमांचे आयोजन करतांना आचारसंहितेचा भंग होणार नाही याची तसेच या कार्यक्रमास राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी/प्रतिनिधी उपस्थित राहणार नाहीत, याची दक्षता घेण्यात यावी. सदर कार्यक्रमाचे आयोजन करताना आदर्श आचारसंहितेचा कोणताही भंग होणार नाही तसेच याबाबत शासनाच्या प्राप्त निर्देशांचे तंतोतंत पालन होईल याची नोंद घ्यावी.

वरील संदर्भातील निर्देश सर्व घटकापर्यंत पोहोचवण्याकरीता आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील मुख्य सूचनाफलकांवर तसेच जिथे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी एकत्र येत असतात (उदा. ग्रंथालय/वाचनकक्ष/वर्गखोल्या/विश्रांतीगृह /उपहारगृह/वसतिगृह) अशा दर्शनी भागात प्रदर्शित करून सर्व विद्यार्थ्यांना व इतर सर्व सदस्यांच्या निदर्शनास आणून मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी मतदार जागृती अभियान यशस्वीपणे राबविण्याकरीता सूचित करावे. सदर उपक्रम विद्यार्थी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/परिसंस्थातील उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामुहिक सहभागातून यशस्वी करण्याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना सूचित करण्यात यावे. सदर स्पर्धा/उपक्रम/कार्यक्रमाचा सविस्तर अहवाल विद्यार्थी विकास मंडळाच्या sppubsd@gmail.com या इमेल वर पाठवण्यात यावा. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे

**(डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार) विद्यार्थी विकास मंडळ

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मावज-२०२५/प्र.क्र.४/का-१०
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: १२ जून २०२५
दूरध्वनी: ०२२ २२०४६९०९

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व)
महानगरपालिका आयुक्त (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायती (सर्व)

**विषय:** मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी मतदार जागृती अभियान राबविण्याबाबत...

महोदय,

महानगरपालिका, नगरपरिषदा/ नगरपंचायत, जिल्हा परिषदा/ पंचाय त समित्या या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांत मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी अधिकाधिक मतदारांनी मतदान करणे आवश्यक आहे. त्यासाठी मतदार जागृती अभियान राबविण्याकरिता पूर्वनियोजन करणे गरजेचे असून, त्यादृष्टीने सोबत परिशिष्ट- १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत. त्यानुसार नियोजन करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये प्रभावीपणे मतदार जागृती अभियान राबविण्यात यावे.

सदर उपक्रमासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या उपलब्ध निवडणूक निधीतून वाजवी खर्चाचे नियोजन व खर्च संबंधित स्तरावरून करण्यात यावे. परिशिष्ट- १ मध्ये नमूद सूचना मार्गदर्शक स्वरुपाच्या असून, स्थानिक गरजेनुसार आणि उपलब्ध संसाधनांनुसार त्यांची अंमलबजावणी करावी. मतदार जागृती अभियान राबविण्यासाठी प्रचलित व विहित प्रशासकीय तथा वित्तीय नियमांचे काटेकोर पालन करावे; तसेच आपापल्या स्तरावर मार्गदर्शक सूचनांव्यतिरिक्त आणखी अभिनव उपक्रम राबविणे शक्य असल्यास तेही राबवावेत, याची कृपया नोंद घ्यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेने,

१२.०६.२०२५
(सुरेश काकाणी)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

## परिशिष्ट- १
## मार्गदर्शक सूचना
(स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार जागृती अभियान- २०२५)

| जिल्हाधिकारी यांच्यासाठी<br>(नगरपरिषदा/ नगरपंचायती, जिल्हा परिषदा/ पंचायत समित्या आणि ग्रामपंचायत निवडणुकांकरिता) | | |
|---|---|---|
| **महानगरपालिका आयुक्त यांच्यासाठी**<br>(महानगरपालिका निवडणुकांकरिता) | | |
| **अ.क्र.** | **उपक्रम** | **तपशील** |
| १. | **मतदार यादीत नाव शोधणे** | • संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी मतदारांना मतदार यादीत सुलभतेने नाव शोधण्याची सुविधा उपलब्ध करून देणे. उदा. संकेतस्थळ, मोबईल ॲप, दूरध्वनी, कॉल सेंटर, चॅटबॉट इ. |
| २. | **पत्रकार परिषदा** | • संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर लगेचच जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त यांनी स्वत: पत्रकार परिषद आयोजित करून मतदारांना मतदानासाठी आवाहन करणे<br>• मतदानाच्या एक दिवस आधीदेखील पत्रकार परिषद घेऊन मतदारांना मतदानासाठी पुन्हा आवाहन करणे आणि मतदान केंद्रावरील सेवासुविधांबाबत मतदारांना अवगत करणे |
| ३. | **मतदारांना शपथ देणे** | • विविध महाविद्यालये, विद्यापीठ, शासकीय कार्यालये, खासगी आस्थापना, मॉल्स विविध सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी ठिकाणी मतदारांना मतदान करण्याची शपथ देणे |
| ४. | **विद्यापीठ/ महाविद्यालये** | • विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये मतदार जागृतीबाबत वादविवाद, वकृत्व, निबंध, चित्रकला, पथनाट्य, रिल्स इ. स्पर्धांचे आयोजन करणे<br>• विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरव करून, त्यांनी सादर केलेल्या कलांचा मतदार जागृतीसाठी वापर करणे<br>• महाविद्यालयांच्या मदतीने अधिकाधिक मतदारांना प्रोत्साहन देण्यासाठी सोसायट्यांना दत्तक देऊन घराघरापर्यंत पोहोचणे<br>• उत्कृष्ट काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना किंवा सोसायट्यांना बक्षिसे देण्याबाबत विचार करणे |
| ५. | **फलक/ होर्डिंग लावणे** | • शासकीय कार्यालये, नागरी सुविधा केंद्र, रुग्णालये, बँका, शैक्षणिक संस्था, सार्वजनिक ठिकाणी, मुख्य चौक इ. ठिकाणी फलक लावणे<br>• पेट्रोल पंप, एलपीजी गॅस वितरक, शिधा वाटप दुकाने इत्यादी ठिकाणी फलक लावंणे<br>• व्यावसायिक होर्डिंगसाठी जनहितार्थ राखीव असलेल्या दिवसांचा वापर करणे |
| ६. | **परिवहन सेवा** | • संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची वाहने व परिवहन सेवेच्या बसेसवर फलक/ बॅनर लावणे<br>• एसटी बस, बस स्थानक, लोकल ट्रेन, रेल्वे स्थानक इत्यादी ठिकाणी फलक/ बॅनर लावणे |

| | | |
|---|---|---|
| | | • सार्वजनिक परिवहन सेवेच्या बसमध्ये किंवा लोकल ट्रेनमध्ये असलेल्या उद्घोषणेच्या सुविधेच्या माध्यमातून मतदारांना मतदानासाठी आवाहन करणे<br>• बस तिकिटांवर मतदानाचे आवाहन करणे आणि मतदानाची तारीख प्रसिद्ध करणे |
| ७. | **सिनेमागृह व नाट्यगृह** | • सिनेमागृह आणि नाट्यगृहांमध्ये मध्यंतराच्या वेळी मतदारांना मतदानासाठी आवाहन करणे<br>• सिनेमा चालक/मालकांची बैठक आयोजित करून लोकहितार्थ संदेश प्रसारित करण्यास सांगणे.<br>• आवश्यकतेनुसार सिनेमागृहात व्यावसायिकदृष्टीने जाहिरात प्रसारित करणे |
| ८. | **वलयांकित व्यक्तींची मदत** | • संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रातील किंवा बाहेरील अराजकीय वलयांकित (सेलेब्रेटी) व्यक्तींच्या माध्यमातून सोशल मीडियाद्वारे मतदानासाठी आवाहन करणे. उदा. खेळाडू, कलावंत, प्रसिद्ध लेखक इ. |
| ९. | **स्वयंसेवी संस्था** | • विविध स्वयंसेवी संस्थांना उत्स्फूर्तपणे मतदार जागृती करण्याचे आवाहन करणे<br>• स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून व्याख्याने, चर्चासत्र, विविध स्पर्धांचे आयोजन करणे इ.<br>• मतदार जागृतीबाबत पथनाट्य स्पर्धा घेणे व उत्कृष्ट पथनाट्यांचे सादरीकरण करणे |
| १०. | **विविध देयके/ निविदा** | • संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालमत्ता व पाणीपट्टीच्या देयकावर मतदान करण्याचे आवाहन करणारा संदेश प्रसिद्ध करणे<br>• महावितरण कंपनी, बीएसएनएल, एमटीएनएले इत्यादींच्या देयकांवर मतदानाचे संदेश प्रसिद्ध करणे |
| ११. | **प्रादेशिक परिवहन कार्यालय** | • प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांशी समन्वय साधून रिक्षा, टॅक्सी, ओलो, उबर इत्यादींच्या चालक- मालकांची बैठक घेऊन त्यांना मतदार जागृती अभियानात सहभागी करून घेणे<br>• रिक्षा, टॅक्शी, ओला, उबर व अन्य खासगी प्रवाशी वाहनांवर मतदार जागृतीचे स्टीकर लावणे |
| १२. | **खासगी आस्थपाना** | • विविध टूर्स ऑपरेटर्स, हॉटेल, रिसॉर्ट, रेस्टॉरंट असोसिएशन आदींच्या बैठका घेऊन त्यांच्या माध्यमातून मतदार जागृती करणे<br>• मतदान करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून ग्राहकांना स्वच्छेने सवलत देण्याबाबत संबंधित संघटना आवाहन करणे<br>• टूर्स ऑपरेटर्सचे कार्यालये, हॉटेल, रिसॉर्ट, रेस्टॉरंट इत्यादी ठिकाणी ठळकपणे मतदानाची तारीख दर्शविणारे फलक लावणे |
| १३. | **राजकीय पक्ष** | • राजकीय पक्षांच्या बैठका घेऊन त्यांना मतदारांमध्ये जागृती करण्याचे आवाहन करणे<br>• राजकीय पक्षांच्या युवक व विद्यार्थी आघाड्यांना मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन करणे |
| १४. | **सोशल मीडिया / डिजिटल मीडिया** | • सोशल मीडियाच्या विविध प्लॅटफॉर्मचा मतदार जागृतीसाठी प्रभावी वापर करणे<br>• संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संकेतस्थळावर ठळकपणे मतदानाचा संदेश प्रसिद्ध करणे |

| | | |
|---|---|---|
| | | • बँकांच्या मदतीने एटीएम स्क्रीनवर संदेश प्रसारित करणे<br>• संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडे उपलब्ध मोबाईल क्रमांकांवर संदेश प्रसारीत करणे (प्रॉपर्टी टॅक्सच्या संदेशाप्रमाणे)<br>• चॅटबॉट किंवा एआयसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करणे |
| १५. | **प्रसारमाध्यमांचा उपयोग** | • मतदार जागृतीसाठी स्थानिक केबल वाहिन्यांवर मुलाखती, चर्चासत्रे आयोजित करणे.<br>• प्रसारमाध्यमांच्या स्थानिक प्रतिनिधींसाठी कार्यशाळेचे आयोजन करणे<br>• स्थानिक एफएम वाहिन्यांवर निवेदकाच्या माध्यमातून उद्घोषणा करण्यासाठी सहकार्य मिळविणे<br>• कम्युनिटी रेडिओंचा प्रभावी व व्यापक प्रमाणात वापर करणे<br>• पत्रकार संघटनांना मतदार नोंदणी आणि जागृती अभियानात सहभागी करुन घेणे<br>• प्रसारमाध्यमांना जनहितार्थ संदेश / जाहिराती प्रसारीत करण्याची विनंती करणे<br>• आकाशवाणी व दूरदर्शनवरील फोन इन सारख्या कार्यक्रमाच्या माध्यमांतून जागृतीबाबत श्रोत्यांच्या /दर्शकांच्या शंका/ प्रश्नांना उत्तरे देणे |
| १६. | **माध्यम आराखडा** | • स्थानिक गरज व उपलब्ध निधी विचारात घेऊन आपापल्यास्तरावर माध्यम आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करणे<br>• माध्यम आराखड्यानुसार स्थानिक वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, जाहिराती देणे<br>• बाह्य मीडियाचा (उदा. होर्डिंग) वापर करणे<br>• चित्ररथ किंवा अन्य अभिनव उपक्रम राबविणे |
| १७. | **आवश्य साहित्य तयार ठेवणे** | • वृत्तपत्रात प्रसिद्धीस द्यावयाच्या जाहिरातींचे नमुने. (आर्ट वर्क)<br>• घडी पुस्तिका / माहिती पत्रके<br>• ठिकठिकाणी लावावयाच्या फलकांचे (पोस्टर्स) नमुने<br>• व्हाट्सअॅप, फेसबुक इ. सोशल मीडियासाठी आकर्षक क्रिएटिव्ह संदेश<br>• सोशल मीडियासाठी मायक्रो फिल्मस्<br>• विविध मोबाईल ऑपरेटर्सच्या माध्यमातून पाठवायचे एसएमएस<br>• आकाशवाणी आणि एफएम चॅनल्ससाठी जिंगल्स<br>• दूरदर्शन आणि इतर विविध वाहिन्यांसाठी ऑडीओ व्हिज्युअल स्पॉट |

- *सूचना मार्गदर्शक स्वरुपाच्या असून, स्थानिक गरजेनुसार आणि उपलब्ध संसाधनांनुसार त्यांची अंमलबजावणी करावी*
- *मतदार जागृती अभियान राबविण्यासाठी प्रचलित व विहित प्रशासकीय तथा वित्तीय नियमांचे काटेकोर पालन करावे*
- *आपापल्या स्तरावर आणखी अभिनव उपक्रम राबविता येत असल्यास त्याचाही मतदार जागृती अभियानात समावेश करता येऊ शकेल.*